# नगर परिषद कार्यालय,मंगरूळपीर जि.वाशिम

जा.क्र./नपम/४६९/२०२६ दिनांक :-१९/०५/२०२६

## -: ई निविदा सूचना:-

### दुसरी वेळ

मुख्याधिकारी मंगरूळपीर जि.मंगरूळपीर यांचे वतीने ई-निविदा सूचना प्रसिध्द करण्यात येते कि , नगर परिषद मंगरूळपीर करिता मंगरूळपीर शहराची घनकचरा व्यवस्थापनाची बायो मायनिंग ची कामे करावयाची असून या कामाबाबत निविदेतील अटी व शर्तीची पुर्तता करू शकत असलेल्या कुठल्याही सक्षम कंत्राटदाराकडून दोन लिफाफा पद्धतीने ई- निविदा मागविण्यात येत आहे. सदर निविदेची सविस्तर माहिती http://mahatender.gov.in या संकेत स्थळावर दि.१९/०५/२०२६ पासून पहावयास उपलब्ध आहे.

| अ.क्र. | कामाचे विवरण | कामाची अंदाजपत्रकीय किंमत (रु.) | कोरे निविदा प्रपत्र किंमत (रु.) | अनामत रक्कम (रु.) | कामाचा कालावधी |
|---|---|---|---|---|---|
| १ | स्वच्छ महाराष्ट्र अभियान नागरी २.० अंतर्गत मंगरूळपीर शहरातील डम्पिंग ग्राउंड येथे जुन्या साठवलेल्या कच-यावर बायोमायनिंग द्वारे प्रक्रिया करने व त्याची विल्हेवाट लावणे | ८,२५,०००/- | २,०००/- | ८,२५०/- | कार्यादेशापासून ६ महिने |

## -: ई निविदा प्रक्रियेचा तपशील :-

| | |
|---|---|
| ई - निविदा online निविदा प्रसिध्दी व विक्री | दि.२०/०५/२०२६ पासून दि.२८/०५/२०२६ सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत |
| ई - निविदा online सादर करणे तसेच निविदा फॉर्म व अनामत रक्कम online भरणे व निविदा online स्विकृती | दि.२०/०५/२०२६ पासून दि.२८/०५/२०२६ सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत |
| online ई - निविदा तांत्रिक तांत्रिक पडताळणी करणे | दि.२९/०५/२०२६ वेळ : ५ वाजताच्या नंतर (शक्य झाल्यास) |

**निविदेसोबत जोडावयाच्या आवश्यक तांत्रिक दस्तएवजाचा तपशील :-**

१. निविदाधारकाने संस्थेचे, कंपनीचे, फर्म ई.चे शासकीय संस्थेचे नोंदणी प्रमाणपत्र निविदेसोबत सादर करणे आवश्यक राहील.
२. वस्तू व सेवा कर (GST) नोंदणी प्रमाणपत्र , पॅन कार्ड व आयकर प्रमाणपत्र किमान मागील तीन वर्षाचे इ.पी.एफ. नोंदणी प्रमाणपत्र निविदेसोबत सादर करणे आवश्यक राहील.
३. आर्थिक वर्ष २०२४-२५ मध्ये किमान १० कामगारांचे सहा महिन्यांनाचा ईपीएफ चालान भरणा पावती निविदेसोबत सादर करणे आवश्यक राहील .
४. निविदाधारकाकडे इएसआयसी नोंदणी प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे व ते निविदेसोबत सादर करणे आवश्यक राहील.
५. यापूर्वी नगर परिषद / महानगर पालिका क्षेत्रामध्ये घनकचरा व्यवस्थापनाअंतर्गत घनकचऱ्यावर वर्गीकरण /विलगीकरण प्रक्रिया करणे, तसेच ओल्या कचऱ्यापासून खत निर्मिती करणे ची कामे ३ नगर परिषद/नगर पंचायत मध्ये केल्याचा अनुभव व एक नगर परिषद/नगर पंचायत मध्ये बायोमायनिंग ची कामे केल्याबाबतचे आयुक्त /

Scanned with OKEN Scanner

मध्ये केल्याचा अनुभव व एक नगर परिषद/नगर पंचायत मध्ये बायोमायनिंग ची कामे केल्याबाबतचे आयुक्त / मुख्याधिकारी यांच्या स्वाक्षरीचे अनुभव असल्याबाबतचे ज्यामध्ये स्पष्टपणे कामाचे विवरण व एकूण कामाचा कालावधी याचा उल्लेख असे प्रमाणपत्र जोडावे .

६. आपल्या कामाच्या अनुभवांच्या कार्यकाळामध्ये आपणास देण्यात आलेल्या कामाच्या अनुभव प्रमाणपत्रात ओल्या कचऱ्यापासून निर्मिती केलेल्या खतास शासनाकडून हरित मानांकन प्राप्त असणे आवश्यक राहील.

७. तसेच सदर निविदा प्रक्रियेकरिता जाइंट व्हेंचर अपात्र असतील ही अट समजूनच निविदा धारकांनी निविदा भरावी.

८. निविदाधारकाने नमुना-अमध्ये पदाधिकारी /नगरसेवक यांचे सोबत हितसंबंध, भागीदारी नसल्याबाबत चे रु.१००/- च्या मुद्रांकावर प्रतिज्ञापत्र सादर करावे.

९. कुठल्याही नगर परिषद /नगर पंचायती /महानगर पालिके मध्ये काळ्या यादीत नाव समाविष्ट नसल्याबाबत व निविदेसोबत सादर करण्यात येणारी कागदपत्रे पुर्णपणे खरी असल्याबाबतचे शपथपत्र रु.५००/- च्या मुद्रांक शूल्कावर निविदेसोबत सादर करणे आवश्यक राहील.

१०. निविदेसोबत सादर करण्यात येणारी कागदपत्रे ही निविदा प्रसिद्ध व्हायच्या आधीच्या तारखेतील असणे बंधनकारक असेल.

११. निविदेतील अटी व शर्ती नुसार निविदेतील सादर कागदपत्रात तांत्रिक तपासणीच्या वेळी संदिग्धता आढळल्यास नगर परिषदे मार्फत कागदपत्रांची शहानिशा करण्याकरिता आवश्यक कागदपत्रांची मागणी केल्यास ती सर्व कागदपत्रे सादर करण्याची जबाबदारी संबंधित निविदा धारकाची असेल ही अट समजूनच निविदा भरावी.

१२. घनकचरा डेपो वरचा सुका कचरा व प्लास्टिक विल्हेवाट लावणे बंधनकारक असेल.प्लास्टिकरी साइकलिंग केल्याच किमान एक नगर परिषद/पंचायत /संस्था/कंपनीचा अनुभव प्रमाणपत्र असने बंधनकारक आहे.

१३. नोंदणीकृत कंत्राटदारांनी अधिकृत डी.एस.सी. प्राप्त करून घेऊन महाराष्ट्र शासनाच्या http://mahatender.gov.in या संकेत स्थळावर नोंदणी करून केवळ ई-निविदा पद्धतीनेच निविदा सादर करावी.

१४. अनामत रक्कम व निविदा विक्रीची किंमत फक्त ONLINE पद्धतीनेस्वीकारले जातील.

१५. सदर कामे करीत असतांना कंत्राटदाराला लागणारे आवश्यक साहित्य , मशिनरी , सुरक्षात्मक फलक , कामे करणाऱ्या कामगारांकरिता सुरक्षात्मकउपाययोजनाजसे हातपंजे , मास्क , स्यानीटायजर ई. याची तरतूद ते स्वतः करतील याची नोंद घ्यावी.

१६. जरनिविदेतील कामे करीत असतांना कामावरील माणसांची जीवित व वित्तीय हानी हानी झाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी कंत्राटदाराची असेल त्याबाबत नगर परिषद मंगरूळपीर कुठल्याही प्रकारे जबाबदार राहणार नाही .

१७. मंजुर कंत्राटदार यांचे मार्फत दैनंदिन रित्या घनकचरा प्रक्रिया व विल्हेवाटीची कामे करीत असतांना दररोज घंटा गाडी मार्फत ज्यादिवशी क्षेपण भूमी येथे आणल्या जाणाऱ्या कचऱ्यावर त्याच समान दिवशी अथवा दुसऱ्या दिवशी प्रक्रिया जसे सुक्या कचऱ्याचे विलगीकरण/ ओल्या कचऱ्यावर प्रक्रिया करणेची कामे होणे आवश्यक राहील. सदर कामात दिरंगाई किंवा कचरा क्षेपण भूमी तेथे कुठल्याही प्रकारची प्रक्रिया न होता पडून राहिल्याचे आढळसल्यास प्रतिदिनं रु.१०००/- दंड प्रमाणे सदर शिल्लक कचऱ्याची विल्हेवाट होईपर्यंत लागणाऱ्या दिवसांकरिता आपले देय बिलातून आकरण्यात येईल ही अट भरूनच निविदा प्रक्रियेत सहभाग नोंदवावा .

१८. उपरोक्त निविदा भरणे करिता कोणत्याही कारणाने कंत्राटदारास ई - निविदा भरणे करिता तांत्रिक समस्या आल्यास / तांत्रिक समस्या उद्भवल्यास त्यास नगर परिषदमंगरूळपीर कुठल्याही प्रकारे जबाबदार राहणार नाही .

१९. कंत्राटदारांनी उपरोक्त निविदा भरणे करिता आवश्यक योजना विवरण , अटी , सदर काम करणे करिता आवश्यक तंत्रज्ञान ई. बाबींचा अभ्यास करूनच ई- निविदा भरावी.

Scanned with OKEN Scanner

२१. कंत्राटदराने कामगार विषयक कंत्राटी कामगार (नियमन व निर्मुलन) अधिनियम १९७० , किमान वेतन कायदा १९४८ , वेतन प्रदान १९३६ , बालकामगार (प्रतिबंध व निर्मुलन) अधिनियम १९८६ व अन्य कायद्याचे तसेच ई.पी.ईफ. कलम १९५२ अन्वये आवश्यक ती कार्यवाही करणे बंधनकारक राहील.

२२. झालेल्या कामांचे मोबदल्यात सादर देयकातून सुरक्षा राशी , नियमानुसार आयकर , जी.एस.टी. कर , उपकर तसेच शासनाचे वेळोवेळी प्राप्त निर्देशांप्रमाणे कराची कपात करण्यात येईल. तसेच नगर परिषदेच्या निधीच्या उपलब्धतेनुसार देयकाचे प्रदान करण्यात येईल.तसेच मंजूर कंत्राटदार यांना नियमाप्रमाणे परफॉर्मेंस राशी नगर परिषदेच्या नावाने काम सुरु करण्यापूर्वी सादर करणे आवश्यक राहील.

२३. **इच्छुक निविदा धारकाने स्वतः डम्पिंग ग्राउंडवर स्थळ पाहणी करून अभियंता मार्फत स्वक्षांकित प्रमाणपत्र व Geotag फोटो अपलोड करणे अनिवार्य राहील.**

२४. मंजूर निविदा धारकाचे काम वाढीव मुदती बाबत चे सर्व अधिकार हे नगर परिषदमंगरूळपीरयांनी राखून ठेवले आहेत.

२५. निविदेतील नमूद कामासंबंधी तांत्रिक मान्यतेचा आदेश व मा. जिल्हाधिकारी यांचे प्रशासकीय मान्यतेच्या आदेशातील सर्व प्रकारच्या अटी व शर्ती यशस्वी निविदाधारकास सदर काम करीत असतांना बंधनकारक असेल .

२६. १) दिनांक २७/०९/२०१८ च्या शासन निर्णयातील परिच्छेद क्र.४.६.३ (ब) मध्ये नमूद " देकार १५% पेक्षा कमी दराचा असल्यास उर्वरित रकमेसाठी दोन पटीने रक्कम डीडी द्वारे सादर करणे अनिवार्य राहील उदा. १९% कमी दराकरिता (१९-१५=४)%•२ =८%) असे सूत्र असयाचे .

**ऐवजी**

२) देकार १५% पेक्षा कमी दराचा असल्यास उर्वरित रकमेसाठी दोन पटीने रक्कम डीडी द्वारे सादर करणे अनिवार्य राहील व त्याचे % पुढील प्रमाणे काढण्यात यावे. उदा. १९% कमी दारासाठी पुढील प्रमाणे पृथक्करण > १०% कमी दरापर्यंत १% व १०% ते १५ % साठी (१५%-१०%=५%) तसेच १५% ते १९% करिता (१९%-१५% = ४% •२ = ८%) असे सांगता येईल . एकत्रित उर्वरित रक्कम १९% कमी दरासाठी ( १%+५%+८%=१४%) असे राहील.

बाब क्र. २ प्रमाणे येणाऱ्या रकमेसह एकत्रित धनाकर्ष द्वारे(demand draft) सादर करणे बंधनकारक राहील.

वरील अटी व शर्ती व्यतिरिक्त कुठलीही अट काढणे अथवा वाढविणे याचा अधिकार मुख्याधिकारी, नगर परिषद मंगरूळपीर यांनी राखून ठेवलेला आहे.

वरीलप्रमाणे नमूद सर्व आवश्यक दस्तऐवज निविदाधारकांनी पी.डी.एफ. स्वरुपात सादर करावी लागेल. जर पी.डी.एफ. स्वरूपातील मूळ अभिलेखे कार्यालयाने मागणी केल्यास सादर करण्याची जबाबदारी संबंधित निविदाधारकाची असेल याची नोंद घ्यावी.

मी/आम्ही निविदेतील संपूर्ण अटी व शर्तीचे वाचन केले असून संपूर्ण अटी व शर्ती मला / आम्हाला मान्य आहेत. तसेच मंगरूळपीर शहराचे संपूर्ण प्रत्यक्षरीत्या सर्वेक्षण करून मी/आम्ही कामाचे स्वरूप समजून घेतले आहे व ते मला /आम्हाला पूर्णपणे अवगत असून मला / आम्हाला मान्य आहे व या सर्व बाबींच्या अधीन राहून मी / आम्ही निविदा दरपत्रक भरण्यास तयार आहे/आहोत .

मुख्याधिकारी
नगर परिषद मंगरूळपीर

Signature Not Verified
Digitally signed by Dinesh Rathod
Date: 2026.05.20 15:47:18 IST
Location: Maharashtra-MH

Scanned with OKEN Scanner